# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १९३ वा ❑ भारतीय सौर दिनांक २६ भाद्र. शके १९४८, गुरूवार दि.१७ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### विदर्भातील अष्टविनायक : प्राचीन वास्तुकलेचा वैभवशाली इतिहास

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जडणघडणीत गणेशोपासनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अष्टविनायकांप्रमाणेच विदर्भाच्या लाल मातीतही गणरायाची आठ अत्यंत प्राचीन आणि जागृत स्थाने दडली आहेत. ही आठ मंदिरे म्हणजे केवळ श्रद्धेची किंवा उपासनेची पारंपारिक केंद्रे नव्हेत, तर ती महाराष्ट्राच्या प्राचीन वास्तुकलेचा, प्रगल्भ शिल्पकलेचा आणि वैभवशाली इतिहासाचा एक अत्यंत महत्त्वाचा दुवा आहेत. या प्रत्येक वास्तूचा स्वतःचा असा एक स्वतंत्र इतिहास, वैशिष्ट्यपूर्ण वास्तुरचना आणि वेगवेगळ्या पौराणिक आख्यायिका आहेत. या सर्व बाबींचा एकत्रित आणि सखोल विचार केल्यास विदर्भातील अष्टविनायकांचे एक अत्यंत भव्य, अभ्यासपूर्ण आणि मनाला भुरळ घालणारे चित्र उभे राहते.

या अष्टविनायक परंपरेतील सर्वांत लोकप्रिय आणि मध्यवर्ती स्थान म्हणजे नागपूरच्या सीताबर्डी टेकडीवर विराजमान असलेला श्री टेकडी गणपती. संपूर्ण विदर्भाचा वरदविनायक म्हणून या गणरायाला आदराने पूजले जाते. या स्थानाचा इतिहास नागपूरच्या भोसले राजवटीशी अत्यंत घट्ट जोडलेला आहे. भोसले राजवटीत राजवाड्याच्या बांधकामासाठी जेव्हा काळ्या पाषाणाचे उत्खनन सुरू होते, तेव्हा या ठिकाणी प्राचीन हेमाडपंथी मंदिराचे अवशेष आणि श्री गणेशाची ही स्वयंभू मूर्ती सापडली, अशी इतिहासात नोंद आहे. मूर्तीशास्त्राच्या अभ्यासकांच्या मते, ही उजव्या सोंडेची अद्वितीय मूर्ती साधारण बाराव्या शतकातील म्हणजेच यादवकालीन असावी. उजव्या सोंडेच्या गणपतीला सिद्धिविनायक किंवा कडक सोवळ्याचा गणपती मानले जाते. या मंदिराबाबतची सर्वांत मोठी विरोधाभासाची आणि आश्चर्याची बाब म्हणजे, शेकडो वर्षांचा प्राचीन इतिहास आणि भोसले राजवटीसारखा भक्कम ऐतिहासिक संदर्भ पाठीशी असूनही कोणत्याही शासकीय राजपत्रात या वास्तूची अधिकृत नोंद आजवर झालेली आढळत नाही. असे असले तरी, कागदोपत्री नोंदींच्या पलीकडे जाऊन या गणरायाने लाखो भक्तांच्या हृदयात आपले अबाधित स्थान निर्माण केले आहे. भक्तांची अलोट गर्दी हेच सिद्ध करते की खऱ्या लोकमान्यतेला कोणत्याही अधिकृत शिक्क्याची किंवा प्रमाणपत्राची गरज नसते.

विदर्भातील गणेश मूर्ती त्यांच्या भव्य आकारामुळे आणि विशिष्ट घडणीमुळे पश्चिम महाराष्ट्रातील अष्टविनायकांपेक्षा पूर्णपणे वेगळ्या ठरतात. या प्राचीन मूर्तीशास्त्राचा आणि शिल्पकलेचा सर्वोत्तम नमुना म्हणजे नागपूर जवळील आदासा येथील शमी विघ्नेश आणि रामटेक येथील अष्टदशभुज गणपती. आदासा येथील गणपतीची मूर्ती ही एकाच अखंड आणि प्रचंड मोठ्या पाषाणात कोरलेली आहे. मूर्तीचे हे विशाल स्वरूप प्राचीन काळातील पाषाण कोरण्याच्या प्रगत तंत्रज्ञानाचे आणि मूर्तीकारांच्या अफाट कौशल्याचे उत्तम उदाहरण आहे. दुसरीकडे, रामटेक येथील अठरा हातांचा गणपती ही संपूर्ण भारतातील मोजक्या आणि अतिशय दुर्मिळ गणेश मूर्तींपैकी एक मानली जाते. आगम आणि तंत्रशास्त्रानुसार, अठरा हातांची मूर्ती ही विशिष्ट सिद्धी प्राप्त करण्यासाठी किंवा संरक्षणात्मक देवता म्हणून स्थापन केली जाते. या मूर्तीच्या हातात विविध शस्त्रे कोरलेली असून, वाकाटक काळातील तंत्रोपासनेचा आणि विशिष्ट पूजाविधींचा हा थेट प्रभाव मानला जातो.

या अष्टविनायक मंदिरांना लाभलेला पौराणिक आणि ऐतिहासिक संदर्भही अतिशय रंजक आणि अभ्यासपूर्ण आहे. वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या केळझर येथील मंदिराला सिद्धिविनायक किंवा एकचक्र गणेश म्हटले जाते. हे मंदिर एका प्राचीन गढीवर म्हणजेच एका छोट्या टेकडीवर वसलेले आहे. संरक्षणाच्या दृष्टीने आणि सभोवतालच्या प्रदेशावर टेहळणी करण्यासाठी प्राचीन काळी अशी उंच स्थाने जाणीवपूर्वक निवडली जात असत. या स्थानाचा संबंध थेट महाभारतातील घटनांशी जोडला जातो. पांडवांच्या अज्ञातवासातील एकचक्रानगरी म्हणजेच आजचे केळझर असावे आणि महाबली भीमाने केलेला बकासुराचा वध याच परिसरात झाला असावा, अशी आख्यायिका या भागात पिढ्यानपिढ्या अत्यंत श्रद्धेने सांगितली जाते. गढीवरील वास्तुकला आणि पौराणिक कथा यांचा हा सुरेख संगम या स्थानाला एक वेगळेच वलय प्राप्त करून देतो.

वास्तुरचना आणि भौगोलिक जल–व्यवस्थापनाचा अत्यंत सूक्ष्म विचार केल्यास यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथील चिंतामणी गणेश मंदिर सर्वाधिक अचंबित करणारे ठरते. या मंदिराची वास्तुरचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि गुंतागुंतीची असून, हे संपूर्ण मंदिर जमिनीच्या खाली म्हणजेच एका प्रशस्त तळघरात बांधलेले आहे. या भूमीगत गर्भगृहात एक नैसर्गिक पाण्याचा झरा असून त्याला भाविक गणेश कुंड असे संबोधतात. निसर्गाचा चमत्कार आणि वास्तुकलेचा अचूक मेळ असा की, दर बारा वर्षांनी या कुंडातील पाण्याची पातळी नैसर्गिकरित्या वाढते आणि ते जल मूर्तीच्या चरणांना स्पर्श करून पुन्हा ओसरते. प्राचीन काळातील जल–वास्तुकलेची आणि भूगर्भातील पाण्याच्या प्रवाहांचा अचूक वेध घेणारी ही एक अत्यंत विस्मयकारक रचना आहे.

या प्रमुख स्थानांसोबतच चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती, ज्याला प्राचीन काळी भांदक म्हटले जायचे, तेथील वरदविनायक, भंडारा जिल्ह्यातील पवनी येथील सर्वतोभद्र गणेश आणि मेंढा येथील भृशुंड गणेश ही स्थानेदेखील या अष्टविनायक परंपरेचे अत्यंत महत्त्वाचे खांब आहेत. प्राचीन काळातील व्यापारी मार्गांवर आणि तत्कालीन राजधानीच्या किंवा प्रमुख बाजारपेठांच्या ठिकाणी ही शहरे विकसित झाली होती. वैनगंगा नदीच्या नयनरम्य तीरावर वसलेले मेंढा येथील देवस्थान परिसरातील निसर्गरम्य शांततेसाठी आणि आध्यात्मिक अनुभूतीसाठी प्रसिद्ध आहे.

एकूणच, विदर्भातील ही सर्व अष्टविनायक मंदिरे काळा पाषाण आणि लाल वालुकाश्म यांचा अत्यंत सुरेख आणि कलात्मक वापर करून बांधलेली आहेत. यातील अनेक मंदिरांचे मूळ बांधकाम हे हेमाडपंथी शैलीतील म्हणजेच चुन्याचा यत्किंचितही वापर न करता विशिष्ट कोनात दगडात दगड अडकवून अत्यंत भक्कमपणे केलेले होते, याचे अनेक पुरावे आजही या परिसरात आढळतात. काळाच्या प्रदीर्घ ओघात अनेक परकीय आक्रमणे आणि निसर्गाच्या तडाख्यामुळे या मूळ वास्तूंचे आणि मंदिरांचे अतोनात नुकसान झाले असले, तरी नंतरच्या काळात, विशेषतः भोसले राजवटीत, त्यांचे अत्यंत श्रद्धेने आणि निष्ठेने नूतनीकरण झाले. इतिहास, पुरातत्त्वशास्त्र, प्रगत वास्तुकला आणि मानवी मनातील अथांग लोकश्रद्धा यांचा असा विलक्षण आणि अद्भुत संगम विदर्भातील या अष्टविनायक तीर्थक्षेत्रांमध्ये पाहायला मिळतो, जो खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या समृद्ध वारशाचा एक सोनेरी अध्याय आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्याच्या इतिहासातील शौर्यगाथा

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे

ज्योतिर्मय साहित्य

आज १७ सप्टेंबर. हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले; मात्र देश स्वतंत्र झाल्यानंतरही मराठवाडा निजामाच्या राजवटीखाली पारतंत्र्यातच होता. त्यामुळे मराठवाड्यातील जनतेला स्वातंत्र्याचा अनुभव घेण्यासाठी आणखी एक संघर्ष करावा लागला. हा संघर्ष केवळ राजकीय नव्हता, तर तो स्वाभिमान, लोकशाही आणि भारतीय एकात्मतेसाठीचा लढा होता.

पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थानाचा भाग होता. या संस्थानावर निजाम मीर उस्मान अली खान याचे राज्य होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संस्थानांनी भारतात सामील व्हावे, अशी भूमिका भारत सरकारने घेतली होती. मात्र निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास नकार दिला. स्वतंत्र हैदराबादचे स्वप्न पाहणाऱ्या निजामाच्या भूमिकेमुळे संस्थानातील जनतेसमोर मोठे संकट निर्माण झाले.

हैदराबाद संस्थानातील जनता मात्र भारताशी एकरूप होण्याच्या बाजूने होती. निजामाच्या राजवटीतून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद मुक्ती संग्रामाला वेग आला. मराठवाड्यातही या आंदोलनाची तीव्रता वाढत गेली. गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्यासह अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी या लढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

हैदराबाद संस्थानात त्यावेळी तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकातील काही प्रदेशांचा समावेश होता. निजामाच्या राजवटीविरुद्ध आवाज उठविणाऱ्या जनतेवर मोठ्या प्रमाणात दडपशाही करण्यात आली. निजामाचा समर्थक कासीम रिझवी आणि रझाकारांच्या कारवायांमुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तरीही स्वातंत्र्याची आस असलेली जनता मागे हटली नाही.

मराठवाड्यातील गावागावांतून स्वातंत्र्यसैनिक पुढे आले. अनेकांनी तुरुंगवास सहन केला, अनेकांनी लाठीमार आणि अत्याचार सोसले, तर अनेकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता भारतीय तिरंग्यासाठी संघर्ष केला. नांदेड, लातूर, परभणी, औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, जालना आणि हिंगोली या भागांतील जनतेनेही या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली. या लढ्यामुळे स्वातंत्र्याची भावना जनमानसात अधिक दृढ झाली.

निजामाच्या राजवटीकडून जनतेवरील अन्याय आणि अत्याचार



सुरूच राहिल्याने भारत सरकारने अखेर कठोर निर्णय घेतला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो'अंतर्गत हैदराबाद संस्थानाविरुद्ध भारतीय सैन्याची कारवाई सुरू झाली. त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल भारताचे गृहमंत्री होते. संस्थानांचे भारतात विलीनीकरण करून देशाची अखंडता मजबूत करण्यामध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

भारतीय सैन्याने विविध दिशांनी हैदराबाद संस्थानात प्रवेश केला. सोलापूरच्या दिशेनेही भारतीय सैन्याने आगेकूच केली. काही दिवसांत भारतीय सैन्याने अनेक महत्त्वाची ठिकाणे ताब्यात घेतली. निजामाच्या सैन्याला भारतीय सैन्यापुढे फार काळ टिकाव धरता आला नाही. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यानंतर निजामाच्या सैन्याने शरणागती पत्करण्याचा निर्णय घेतला.

अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून मुक्त झाले. निजामाच्या सैन्याचे प्रमुख जनरल एल–एड्रूस यांनी भारतीय सैन्यासमोर शरणागती पत्करली. त्यानंतर हैदराबाद संस्थान भारताचा अविभाज्य भाग बनले आणि या प्रदेशात तिरंगा अभिमानाने फडकला. मराठवाड्यातील जनतेच्या दीर्घ संघर्षाला अखेर यश मिळाले.

मराठवाडा मुक्ती संग्राम हा भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. देशाला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले असले, तरी मराठवाड्यातील जनतेला निजामाच्या अन्यायी राजवटीतून मुक्त होण्यासाठी १९४८ पर्यंत संघर्ष करावा लागला. त्यामुळे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाड्याच्या स्वाभिमानाचा, त्यागाचा आणि संघर्षाचा दिवस आहे.

आजच्या पिढीने या इतिहासाकडे केवळ सुट्टीचा किंवा औपचारिक कार्यक्रमाचा दिवस म्हणून पाहू नये. स्वातंत्र्य आपल्याला सहज मिळालेले नाही. असंख्य ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी त्यासाठी त्याग केला आहे. त्यांच्या संघर्षामुळे आज आपण लोकशाही, स्वातंत्र्य आणि संविधानिक अधिकारांचा उपभोग घेत आहोत. त्यामुळे या इतिहासाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि पुढील पिढीला स्वातंत्र्याच्या मूल्यांची जाणीव करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

मराठवाडा मुक्ती संग्रामाने आपल्याला एक महत्त्वाचा संदेश दिलाअन्याय कितीही मोठा असला तरी संघटित जनशक्ती, धैर्य आणि स्वातंत्र्याची प्रबळ इच्छा यांच्यापुढे तो टिकू शकत नाही. या संग्रामातून राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही आणि स्वाभिमानाचे महत्त्व अधोरेखित होते.

मराठवाड्याच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या आणि आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना या दिनी विनम्र अभिवादन! त्यांच्या त्यागाची आणि शौर्याची गाथा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यसैनिकांना मानाचा मुजरा!

सर्व मराठवाडावासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



## मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन उत्साहात साजरा

ज्योतिर्मय साहित्य

पुणे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालय पौड रोड येथे राज्यशास्त्र विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचे औचित्य साधून मंगळवार दि.१५/०९/२०२६ रोजी ''लोकशाही व भारतीय संविधान''या विषयावर डॉ. मनोज मते (राजकीय विश्लेषक व अभ्यासक) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या व्याख्यानाच्या माध्यमातून डॉ. मनोज मते यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या संकल्पनांचे लोकशाहीतील महत्त्व राज्यघटना निर्मिती आणि लोकशाही मूल्यांचा संविधानामध्ये करण्यात आलेला समावेश, त्याचबरोबर भारतीय संविधानाला लाभलेला संतपरंपरेचा वारसा उलगडून सांगितला.

व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. किर्ती करंजावणे यांनी केले. याप्रसंगी डॉ. शुभांगी औटी, डॉ. आदिनाथ पाठक, प्रा. संतोष मोरे, डॉ. श्रीनिवास ईपलपल्ली, डॉ. शोभा तितर, डॉ. रूपाली शेंडकर, डॉ. स्वाती शिंदे उपस्थित होते.

## एमआयटी पॉलिटेक्निकमध्ये 'इशरे' विद्यार्थी शाखेची स्थापना

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – एमआयटी पॉलिटेक्निक, छत्रपती संभाजीनगर येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागांतर्गत इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर–कंडिशनिंग इंजिनिअर्स विद्यार्थी शाखेची औपचारिक स्थापना करण्यात आली.

या स्थापना कार्यक्रमास इशरे छत्रपती संभाजीनगर शाखेचे अध्यक्ष श्री. सौरभ जयस्वाल तसेच अध्यक्ष–निर्वाचित श्री. संदीप पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी यांत्रिकी अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. आर. व्ही. देशमुख, इशरे विद्यार्थी शाखेच्या समन्वयक प्रा. विशाखा बोरसकर यांच्यासह विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थी शाखेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये आयुष देशमुख अध्यक्ष, श्रावणी मेनकुदळे अध्यक्ष–निर्वाचित, अक्षद धसाळ




सचिव आणि कार्तिक जयगुडे कोषाध्यक्ष यांची निवड करण्यात आली.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमादरम्यान आपल्या जबाबदाऱ्यांची शपथ घेतली आणि विद्यार्थी शाखेच्या विकासासाठी तसेच विविध उपक्रमांच्या प्रभावी आयोजनासाठी सक्रियपणे कार्य करण्याचा संकल्प केला.


इशरे विद्यार्थी शाखेच्या स्थापनेमुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान, व्यावसायिक कौशल्ये, उद्योग क्षेत्राशी संवाद तसेच हीटिंग, रेफ्रिजरेशन आणि एअर–कंडिशनिंग क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व अद्ययावत घडामोडींची माहिती मिळण्याच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या शाखेच्या माध्यमातून विविध तांत्रिक, व्यावसायिक आणि विद्यार्थी–केंद्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या आगामी कार्यासाठी यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ वाय ए कवडे , एमआयटी चे महासंचालक प्रा मुनिश शर्मा व प्राचार्य डॉ सुनिल देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.

# आठवणींनी भरलेला मराठवाडा मुक्ती संग्राम दिन


ज्योतिर्मय साहित्य

भारताला स्वातंत्र्य मिळाले १५ऑगस्ट,१९४७ रोजी. मात्र देशातील तीनशे–साडेतीनशे संस्थानिक स्वतंत्र झालेली नव्हती, तेथील संस्थानिक ते संस्थान आपल्या अधिपत्याखाली चालवत होते. यातील एक संस्थान म्हणजे हैदराबादचे, जुलुमी संस्थानिक निझाम होय. हा निझाम स्वतंत्र भारतात विलीन व्हावयास तयार नव्हता. या निझाम राजवटीत मराठवाडा भाग ही त्याच्या अधिपत्याखाली होता. देश स्वतंत्र झाल्यावरही त्याची जुलुमी राजवट मराठवाडा विभागातील नागरिकांवर अन्याय, अत्याचार व जुलुम, जबरदस्ती करीत होती तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बरीच संस्थाने देशात विलीन केली होती पण निझाम विलीन होत नव्हता, शेवटी पोलीस ॲक्शन





करावी लागली तेंव्हा १७ सप्टेंबर, १९४८ ला निझाम शरण आला व हैदराबाद (मराठवाडा) विभाग मुक्त झाला, स्वतंत्र झाला या मुक्ती लढ्यात अनेकांना आपल्या जीवाची बाजी लढवावी लागली. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले पाहिजे यासाठी या विभागातील नागरिकांनी अभूतपूर्व लढा दिला, या लढ्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वामी रामानंद तीर्थ यांच्यावर सोपविण्यात आली होती.

स्वामी रामानंद तीर्थ यांचे पूर्वाश्रमीचे नाव होते व्यंकटेश भगवानराव खेडगीकर. ते मूळचे कर्नाटकातिल विजापूर जिल्ह्यातील सिंदगी या गावचे होते. त्यांच्या नेतृत्वाखाली मुक्ती संग्राम लढा आरंभ झाला. हैद्राबाद संस्थानावर मीर उस्मान अली खान या धर्मांध निजामाची सत्ता व रझाकाराचा अनन्वित जुलुम या विरुद्ध लढा देणे एक अग्निदिव्य होते.या स्वातंत्र्य संग्रामात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्राफ, विजयेंद्र काबरा, श्री. वैशंपायन, आ.कृ वाघमारे, विठ्ठलराव काटकर, बरदापुर पोलीस स्टेशन उडवून देणारे हरिश्चंद्र जाधव, होरटीकर गुरुजी, तसेच हुतात्मा अनंत कान्हेरे, सांडू वाघ, अशा कितीतरी हुतात्म्यांनी स्वातंत्र्य साठी हौतात्म्य पत्करले. याशिवाय या लढ्यात महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या राणी लक्ष्मीबाई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बदनापूरच्या दगडाबाई शेळके, आशाताई वाघमारे, परभणीच्या शांता पेडगावकर, राजकुंवर काबरा, बीडच्या शांताबाई कोटचा, दानकुंवर फिरोदिया, प्रतिभाताई वैशंपायन, सुशीला दिवाण, कुसुमावती रसाळ, इत्यादी महिलांनीही मुक्ती संग्राम लढ्यात भाग घेतला होता. वैजापूर तालुक्यातील सदगुरु गंगागिरी महाराजांचे सरला बेट ताब्यात घेण्यासाठी निजामी लष्कर व विजयेंद्र काबरा यांच्या मार्गदर्शनखाली तयार झालेल्या जन राज्याच्या लष्करी सैनिकांची निकराची झुंज झाली यात नांदेड चे गंगाधर येरावर, गुजरातचे जगजीवन व वैजापूरचे जगन्नाथ भालेराव शहीद झाले. निजामी लष्कराला यात यश मिळाले नाही. अशा विविध आठवणींनी भरलेला हा मुक्ती संग्राम लढा आजही स्मरणात राहतो. मराठवाडा मुक्ती लढ्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांच्या शौर्याला कोटी! कोटी! प्रणाम.



धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४

***




## जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
नको ढवळं आभाळ
जमव काळे ढग
दुर होईल आबाळ ||८४८||

अरे बरस पावसा
पाह्यु भरल्या घराला
रित्या हातान फिरून
नही जात नडलेला ||८४९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७३




ज्योतिर्मय साहित्य

परंतु नामसाधनेत असे कष्ट देहाला पडत नाहीत. नामसाधना सोपी आहे. तुकाराम महाराज देखील सांगतात,''नामसंकीर्तन साधन पै सोपे, जळतील पापे जन्मांतरीची.''मग एवढे सोपे साधन सोडून देहाला ताडन करणारी इतर साधने का अवलंबावीत ?

या संसारात देखील मानवी देहाला अनेक प्रकारचे कष्ट होतात. नानाविध त्रासांना सामोरे जावे लागते. प्रारब्धाने वाट्याला आलेले दुःख भोगावेच लागते. या सगळ्या गोष्टीत शरीराला प्रचंड त्रास होतो. आपण म्हणतो की कोणी कोणाचे दुखणे वाटून घेऊ शकत नाही. हे खरेच आहे. प्रारब्धाने आलेले दुःख ज्याचे त्यालाच भोगावे लागते. पण सगळ्या परिस्थितीत रामनाम औषधाचे काम करते. देहाला वेदना होतील पण रामनामामुळे तो त्रास मनापर्यंत पोहोचत नाही. देहाच्या दुःखावर इतर औषधे तात्पुरती काम करतात पण रामनाम त्यावर मात करण्याची शक्ती देते. मात्र ते औषध नियमितपणे घोट घोट पोटात जायला हवे.



रामनामाचे इतके महत्व समर्थ पुन्हा पुन्हा सांगत आहेत. एखाद्याला एखादी गोष्ट सांगून, समजावूनही पटली नाही तर त्याला एखाद्या मोठया व्यक्तीचे उदाहरण देऊन समजवावे लागते. समर्थ म्हणतात,'' हे मना, अरे तुला किती आणि काय सांगू ? प्रत्यक्ष योगियांचा राणा असलेले भगवान शंकर देखील श्रीरामाचा जप करतात. त्याचेच चिंतन करतात. मग तुला करायला काय हरकत आहे ?'' श्रीराम हे देवांचे देव आहेत. त्यांनीच देवांना रावणाच्या बंदिवासातून सोडवले आहे. आदी आणि अंत तेच आहेत. तेव्हा हे मना, प्रभात समयी रामाचे चिंतन कर.


स्वसंवाद : १. मी परमेश्वर प्राप्तीसाठी किंवा समाधानासाठी केवळ बाह्य कष्टांचे (उपासतापास, कठीण व्रतवैकल्ये) अवडंबर माजवत आहे का?

२. जेव्हा शारीरिक किंवा मानसिक व्याधींमुळे माझ्या देहाला दुःख होते, तेव्हा मी निराश होतो की रामनामरूपी औषधाचा आश्रय घेतो?

३. ''कोणी कोणाचे दुखणे वाटून घेऊ शकत नाही'' हे त्रिकालाबाधित सत्य स्वीकारून, मी माझ्या मनाला नामस्मरणाने खंबीर बनवले आहे का?

४. जर प्रत्यक्ष भगवान शंकर (देवाधिदेव) निरंतर रामनामाचे चिंतन करतात, तर मग संसारी असलेल्या माझ्या मनाला नामस्मरणाचा संकोच का वाटावा?

(क्रमशः)




## ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918559

इच्छास्वप्न

इच्छा ती असावी जी पूर्ण होऊ शकेल स्वप्न तेच पहावेत जे आपल्या आटोक्यात असतील आणि कर्ज तेवढेच घ्यावे ज्याची परतफेड होऊ शकेल म्हणूनच "अंथरुण पाहून पाय पसारावेत" हे कायम लक्षात ठेवावे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकचः प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

### आपले सण आपले उत्सव महालक्ष्मी/ गौरी

भाद्रपद महिन्यातील शुक्ल अष्टमीस, अनुराधा नक्षत्रावर महालक्ष्मी चे आगमन होते. त्यानंतर ज्येष्ठ नक्षत्रावर तिचे पूजन होते, तर मूळ नक्षत्रावर मातेचे विसर्जन करण्यात येते.

महाराष्ट्रातील काही भागात विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्र या भागात या सणाला महालक्ष्मी असे न म्हणता गौरी असे म्हणतात.

गौरी या शब्दाचा अर्थ पार्वती असाच होतो. पार्वती व तिचा पुत्र गणेश असा एकत्रित उत्सव गणेशोत्सव दरम्यान साजरा होत असतो. इथे गौरीला आपली लेक म्हणून समजण्यात येते, व ती माहेरी आली आहे, म्हणून तिचे स्वागत व पूजन केले जाते. यानिमित्ताने या भागात लोक आपल्या विवाहित मुलींना या गौरी सणासाठी माहेरी बोलावतात.

मराठवाडा विदर्भ या भागात या सणाला महालक्ष्मी असे संबोधण्यात येते.लक्ष्मी ही विष्णूची पत्नी आहे. या भागात एक ऐवजी दोन महालक्ष्मी स्थापन करून या मुहूर्तावर त्यांचे पूजन करण्यात येते. या भागातील मंडळी लक्ष्मीला आपली मुलगी नाही तर सून समजतात. या सणात आग्रहपूर्वक बाहेरगावी असलेल्या सुना व मुले आग्रहाने आपल्या घरी येऊन हा सण साजरा करतात. या काळात सुनांना माहेरी जाण्याची परवानगी नसते.


क्रमशः





### कृतज्ञता:जीवनाचा भाग

मित्रांनो, आपल्या मायबोली मराठीत असे खुप शब्द आहेत, ते लिहायला जसे अवघड तसे समजायलाही अवघड. कृतज्ञता हा शब्द आदरार्थी ऊपकारदर्शक, अनुमती दर्शक आहे. याचा विरोधी शब्द आहे कृतघ्न. म्हणजे मनाचे,स्वतःचे ऐक. चुकणे, अपूर्ण राहणे व पूर्ण झाल्यावर एखाद्या नात्याप्रती 'कृतज्ञता'हा शब्द संतुलन सांधतो.प्रिय व्यक्तीचा सहवास, चांगली गोष्ट, निरोगी जीवन, वाचणे मनाची शांतता या लहान पण महत्वपूर्ण गोष्टी आहे. म्हणून आपले जीवन सुदंर होते.म्हणून अशा गोष्टींचे रोज कौतुक करावे!वाचकांनो अजून सोपे सांगतो, एखादे सुदंर चित्र, कलाकृती सर्वासाठी एकच राहील पण प्रत्येकाचे अंतर्गत जग वेगळं आहे ती म्हणजे कृतज्ञता. स्त्री पुरुषाच्या आत निर्माण होणार्या सुखदुःखाच्या भावना, तरंग हे अंतरिक जग असतं, ते व्यक्तीपरत्वे भिन्न असतं.भावना, एकमेकाशी नातं, प्रेम, तिरस्कार, तणाव, मुल्य व संवेदना जागृत होणे,वास करणे हिच कृतज्ञता.म्हणून 'मन चंगा तो कठोत मे गंगा" अशी म्हण आहे.आणि हे ज्याला साधले त्याला सर्व साधते. आज एवढं तत्वज्ञान पुरे करतो व थांबतो. स्वस्थ रहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा - माणसाचे वाचत राहा सुप्रभात.

## ॥ श्री दत्त महिमा ॥



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड



### आनंदे दत्तात्रेय देव देव


ज्योतिर्मय साहित्य

सर्वज्ञ दासोपंत एक दत्तसंप्रदायातील मोठे प्रस्थ बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे दत्त संप्रदायातील मोठे स्थान थोरले देवघर व धाकटे देवघर नावाने प्रख्यात आहे.

सर्वज्ञ दासोपंत आणि संत एकनाथ महाराज समकालीन दोघांचाही दत्तसंप्रदायाशी निकटचा संबंध आहेच व याच दासोपंतांचा आद्यपीठ वरद दत्त संस्थान यांचाही निकटचा संबंध आपण या लेखमालेत पाहणार आहोत.

दत्तावतारी सर्वज्ञ दासोपंत यांचा जन्म कर्नाटक आणि तेलंगाना याच्या सीमेवरील नारायण पेठ येथे भाद्रपद वद्य अष्टमी शके १४७३ परीघावी नाम संवत्सर सोमवारी मध्यरात्री झाला असा उल्लेख आढळतो त्यांचे माता पार्वती व पिता दिगंबर पंत हे होत. दिगंबर पंत हे बिदरच्या राज्यातील नारायण पेठ चे देशपांडे त्यांच्याकडे महसूल जमा करण्याचे प्रमुख कार्य होते.

बालपणापासून विरक्ती आणि दत्त भक्तीची ओढ असणारे दासोपंत अंबाजोगाई येथे स्थायिक झाले त्यांनी माहूर येथील अनुसया शिखरावर बारा वर्ष कठोर साधना केली त्यांना तेथे दृष्टांत झाला की राक्षस भवन येथे जाऊन



वाळवंटा नजीक दत्तस्थानावर जावे त्याप्रमाणे त्यांनी राक्षसभुवन क्षेत्री साधना केली ते स्थान म्हणजे आद्यपीठ वरद दत्त संस्थान हे होय या स्थानि त्यांना प्रत्यक्ष दत्त महाराजांनी आपल्या चरण पादुका प्रदान केल्या ज्या आजही देवघरात नित्य पूजेत आहेत त्यावेळी त्यांना विरक्ती मुळे हिमालयात जाण्याची इच्छा होती मात्र त्यांना दत्त महाराजांनी आज्ञा केली की तू सरस्वती सेवा अर्थात साहित्य सेवा करावी व दत्त संप्रदाय वाढवावा म्हणून त्यांनी अंबाजोगाई येथे कार्य सुरू केले.

दत्त संप्रदायातील दत्त महाराजांचे १६ अवतार यांची साधना करणारे भारतातील एकमेव स्थान म्हणजे अंबाजोगाई येथील देवघर आहे.

श्रीमद्भागवत ग्रंथातील वर्णना नुसार नवविधा भक्ती मधील सख्य भक्ती त्यांची दत्त महाराजा प्रती होती. संत एकनाथ महाराज व दासोपंत यांची अंबाजोगाई येथे भेटी प्रसंगी दत्त महाराज आणि दासोपंत सोंगट्या खेळत होते असा प्रसंग वर्णित आहे

दासोपंतांनी आपल्या साहित्यामध्ये अनेक भाषांचा उपयोग करून दत्तभक्ती चा उल्लेख केला आहे त्यांची मराठी सारस्वतात मोठी देणगी म्हणजे चार फूट रुंद व ४० फूट लांब कापडावर सचित्र केलेले लेखन अर्थात पासोडि आजही संरक्षित आहे असे हे महान दत्तभक्त ज्यांना राक्षसभुवनक्षेत्री प्रत्यक्ष दत्त महाराजांनी आपल्या चरण पादुका प्रदान केल्या त्यांनी काही काळ वरददत्त संस्थान मध्ये वास्तव्य केले असा या दोन्ही प्राचीन संस्थानचा अन्योन्य संबंध एक वेगळेच नाते दर्शवतो आजही दोन्ही संस्थांचे तितकेच संबंध प्रचलित आहेत


गुरुदेव दत्त कृपा करा

***

## ॥ अभंग-माधव ॥



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



*असंगाशी* संग । कधी ना करावा ।
आब हा राखावा । आपुलाच ॥१॥
*असत्याला* साथ । देणे असे पाप ।
तेणे आपोआप । दोष लागे ॥२॥
*अविचार* येता । मनी, हलकेच ।
काढावा लगेच । मनातून ॥३॥
*अविवेक* येता । तो आचरणात ।
अशाने जनात । छी थू होते ॥४॥
*अज्ञान* ह्या जगी । पसरले फार ।
करावा प्रसार । ज्ञानाचा हो ॥५॥
*अभंगाची* आस । असू दे कायम ।
मन होई शम । कायमचं ॥६॥
माधव हा म्हणे । हीच ठेवा ध्यानी ।
सहा कृत्ये मनी । निरंतर ॥७॥

# गणेशोत्सव - 2026



संजय व्यापारी, विसलिंग पाल्म्स, पुणे यांच्या घरातील अष्टविनायक दर्शन चं सुंदर देखावा.



श्री संत ज्ञानेश्वर भजनी मित्र मंडळ कस्पटेवाडी पुणे येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने श्री तिरुपती बालाजी मंदिर चा सुंदर देखावा केला आहे.



ज्ञानेश्वरी शंतनू व्यास, राक्षसभुवन (शनिचे) ता. गेवराई जि.बीड यांच्या घरचा हा सुंदर गणेशोत्सव देखावा. (9373031853)



## उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांनी केली श्री. गणेश आरती

ज्योतिर्मय साहित्य

वैजापूर - येथील श्री.स्वामी समर्थ केंद्रातील, श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक गणेश मंडळाच्या श्री गणेश मूर्तीची आरती मंगळवार (ता.१५) रोजी वैजापूर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्या द्वारे सम्पन्न झाली. त्यांनी या मंडळाच्या सांस्कृतिक ,सामाजिक, नैतिक मूल्ये तसेच नैसर्गिक मूल्ये जपणाऱ्या उपक्रमाचे अभिनंदन केले. या प्रसंगी नगरसेवक लिमेश वाणी, सचिन वाणी, देविदास वाणी, जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, बापू गावडे, सी. के.पवार, सामाजिक कार्यकर्ते व जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, उल्हास साळुंके, सचिन राजपूत, मधुकर साळुंके, समर्थ सुमनबाई आलूले, सुरेश आलूले, गुळसर,कार्तिक वाणी व श्री.स्वामी समर्थ सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जैन कासार समाज संस्थेच्या वतीने आजपासून पर्युषण पर्व व्याख्यानमाला

ज्योतिर्मय साहित्य

सोलापूर - दरवर्षीप्रमाणे यावर्षी बुधवार, दि.१६ सप्टेंबर, २०२६ ते शुक्रवार,दि.२५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत दररोज संध्याकाळी ठीक ०७:३० वाजता ऑनलाइन पर्युषण पर्व प्रवचनमाला आयोजित करण्यात आली आहे. धर्मानुरागी समाज बांधवांनी या ऑनलाइन प्रवचनमालेचा सहकुटुंब सहपरिवार लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विजयअण्णा कासार व संस्थापक अध्यक्ष पोपटलाल डोर्ले यांनी केले आहे.

दि.१६ सप्टेंबर रोजी उत्तम क्षमा : श्री.अनंत बळ्ळे, सोलापूर, दि.१७ रोजी उत्तम मार्दव - ऍड. प्रभा मांगले, राजापूर, दि.१८ उत्तम आर्जव - श्री.अरुण धुमाळ, सोलापूर, दि.१९ रोजी उत्तम शौच :- प्रा. डॉ. श्रीधर, बेंगलुरु, दि.२० रोजी उत्तम सत्य :- प्रा. डॉ. महावीर शास्त्री, सोलापूर, दि.२१ उत्तम संयम - प्रा. धन्यकुमार बिराजदार, सोलापूर. दि.२२ रोजी उत्तम तप - डॉ. अजित पाटील, सांगली, दि.२३ रोजी उत्तम त्याग :- सी ए वर्धमानकुमार कासलीवाल, डोंबिवली, दि.२४/०९/२०२६ उत्तम आकिंचन्य - डॉ. सुरेखा संजय नरदे, सांगल, दि.२५ रोजी उत्तम ब्रह्मचर्य : श्री. तीर्थंकर अप्पासाहेब माणगांवे, हसूर हे आपले विचार मांडणार आहेत.

ही प्रवचनमाला गुगल मीट या ॲपवर होईल.


दररोजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. केतकी धने व प्रा. धन्यकुमार बिराजदार करणार आहेत

व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी केंद्रीय उपाध्यक्ष प्रकाश मांगले मुख्य संघटक प्रा.सुभाष दगडे, कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर आदी प्रयत्नशील आहेत.

## चुडाराम बल्हारपुरे यांचे गोंडवानाचा महायोध्दा: क्रांतिवीर बाबूराव शेडमाके नाटक विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

ज्योतिर्मय साहित्य

गडचिरोली - विदर्भातील प्रसिध्द नाटककार व महाराष्ट्र शासन पुरस्कृत साहित्यिक चुडाराम बल्हारपुरे यांच्या मधुश्री प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेल्या व संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या गोंडवानाचा महायोध्दा : क्रांतिवीर बाबूराव शेडमाके या नाटकातील नाट्यांश (अंक ३, प्रवेश ६) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या बी. ए. तृतीय वर्षाच्या गोंडवाना भाषावैभव - भाग ३, सत्र ५ च्या अभ्यासक्रमात नविन शिक्षण धोरण अंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील साहित्यिक, सांस्कृतिक व नाट्य क्षेत्रात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.




गोंडवानाच्या स्वातंत्र्यासाठी जीवाचं रान करुन वयाच्या २५ व्या वर्षी शहीद झालेल्या चांदागडच्या सुपुत्राची - आदिवासी गोंडराजाची शौर्यगाथा असलेल्या या नाटकाची विद्यापीठाने दखल घेतल्यामुळे गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थी या नाटकाचा अभ्यास करणार आहेत. व गडचिरोली जिल्ह्यातील या आद्य क्रांतीकारकाच्या इतिहासाला नविन उजाळा मिळणार असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

चुडाराम बल्हारपुरे यांचे गोंडवानाचा महायोध्दा : क्रांतिवीर बाबूराव शेडमाके हे केवळ झाडीपट्टीतच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रात गाजलेले नाटक असून शासन स्तरावरुन या नाटकाचे अनेक प्रयोग अनिरुध्द वनकर यांचे दिग्दर्शनाखाली सादर झालेले आहेत. तसेच राज्य परिवहन महामंडळ, गडचिरोली यांचेतर्फे देखील या नाटकाचे प्रयोग विभागीय स्तरावर नाट्यस्पर्धांमधून सादर करण्यात आले आहेत. विविध संस्थांचे राज्यस्तरीय १० पुरस्कार या नाटकास प्राप्त झालेले आहेत. चुडाराम बल्हारपुरे यांनी गोंडवाना विद्यापीठातील मराठी अभ्यास मंडळाचे आभार मानले आहे.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'पती-पत्नी' (संसार रथाची दोन चाके)

पुढे.....

मुलांच्या शाळा, त्यांची दुखणी-खुपणी, संसाराची ओढाताण आणि नातेवाईकांकडील सुख-दुःखाचे प्रसंग या सगळ्यांना ते दोघे एकत्र सामोरे जातात. घरात मूल आजारी असेल, तर दोघेही त्याच्या उशाशी रात्र-रात्र जागून काढतात. अशा वेळी पत्नीचे जागरण झाले असेल, तर पती मायेने म्हणतो, "तू थोडं खाऊन घे आणि विश्रांती घे; मी बसतो त्याच्याजवळ." कधी एखाद्या संकटात तिच्या दुःखाचा बांध फुटतो, तेव्हा तो विश्वासाने पाठीवर हात ठेवून म्हणतो, "अगं, मी आहे ना... काळजी कशाला करतेस?" आणि त्याच्या एका आश्वासक मिठीत ती स्वतःचे सगळे दुःख विसरून जाते. अशा वेळी पती जर कुटुंबाचा भक्कम आधारवड असेल, तर पत्नी त्या घराला 'घरपण' देणारी मंगलमय नंदादीप असते!

या नात्यात प्रेम जितके महत्त्वाचे, तितकाच आदर आणि एकमेकांच्या स्वातंत्र्याची जपणूकही मोलाची असते. 'मी' पणाचा त्याग करून जेव्हा दोघे 'आम्ही' होतात, तेव्हा संसाराचा हा रथ अतिशय सुरळीत चालतो. लहान-सहान भांडणे, रुसवे-फुगवे आणि पुन्हा एका मिश्कील संवादाने सर्व विसरून एकत्र येणे, हीच या नात्याची खरी गोडी असते. (क्रमश )



## ॥ श्री गणेश चिंतन ॥

*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

### समर्थांच्या मनाच्या श्लोकातील प्रारंभी चे गणेशतत्व....

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥१॥

हा केवळ मंगलाचरणाचा श्लोक नाही. समर्थ रामदास स्वामींचे गणेशविषयक विवेचन केवळ "विघ्नहर्ता गणपती" एवढे मर्यादित नाही; त्यात सगुण गणेशापासून निर्गुण तत्त्वापर्यंत जाणारे अत्यंत सुंदर अद्वैतसूचक चिंतन आहे.

विशेषतः श्रीदासबोध, दशक १ स्तवननाम, समास २ "गणेशस्तवन" हा यासाठी अत्यंत महत्त्वाचा स्रोत आहे. समर्थांनी या समासात गणेशाचे रूप, त्याचे ज्ञानस्वरूप, वाणी, विद्या, शक्ती आणि अंतर्मुख करणारे तत्त्व यांचे वर्णन केले आहे.

"मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा" ही ओळ फार गहन आहे. गणेश म्हणजे केवळ सोंड, मोदक, मूषक असलेली देवता नव्हे; निर्गुण ब्रह्माचे सगुण प्राकट्य ज्या आदितत्त्वातून समजते, त्या आरंभतत्त्वाचे प्रतीक गणेश अशी समर्थांची दिशा दिसते. उपलब्ध विवेचनांमध्येही या ओळीचा संबंध ॐकार आणि निर्गुणाच्या सगुण प्राकट्याशी जोडला आहे.

२." दासबोधातील गणेशस्तवन" तर आणखी सुंदर आहे

दासबोधाच्या दशक १, समास २ मध्ये समर्थ प्रथम गणेशाचे ध्यान करतात आणि नंतर त्याच्या अवयवांचे, अलंकारांचे, आयुधांचे वर्णन करतात. उदाहरणार्थ

शोभे फरश आणी कमळ ।
अंकुश तिक्षण तेजाळ ।
येके करीं मोदकगोळ ।
तयावरी अतिप्रीति ॥२०॥

परशू, कमळ, अंकुश आणि मोदक ही चारही चिन्हे केवळ मूर्तीची शोभा नाहीत. समर्थांच्या तत्त्वदृष्टीने त्यांचा अंतर्मनाशी संबंध लावता येतो विघ्नांचे छेदन, निर्मळता, मनाला योग्य दिशेने नेणारा अंकुश आणि ज्ञानानंदाचे प्रतीक असलेला मोदक. आणखी विशेष म्हणजे समर्थ गणेशाच्या नृत्याचेही वर्णन करतात.

आणि मला वाटते, आपल्यासाठी यातील सर्वांत सुंदर धागा हा आहे

"गणाधीश" → "मुळारंभ" → "निर्गुण" → "शारदा" → "चत्वार वाचा" → "राघव"

म्हणजे समर्थांची वाटचाल अशी आहे:

गणेश → बुद्धी → वाणी → ज्ञान → निर्गुण → राम.

म्हणूनच गणेशस्तवन हे केवळ गणपतीचे रूपवर्णन नाही; ते साधकाच्या अंतःकरणातील जडत्वापासून चैतन्यापर्यंतच्या प्रवासाचे सूक्ष्म रूपक म्हणून वाचता येते. जय जय रघुवीर समर्थ

प्रारंभी विनति करु गणपती विद्यादयासागरा ।
अज्ञानत्व हरोनि बुध्दि मति दे आराध्य मोरेश्वरा ॥
चिंता क्लेश दरिद्र दुःख अवघे देशांतरा पाठवी ।
हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहु तोषवी ॥ १॥
नेत्री दोन हिरे प्रकाश पसरे अत्यंत ते साजिरे ।
माथा शेंदूर पाझरे वरि बरे दूर्वांकुराचे तुरे ॥
माझे चित्त विरे मनोरथ पुरे देखोनि चिंता हरे।
गोसावीसुत वासुदेव कवि रे त्या मोरयाला स्मरे॥ २॥

(क्रमशः )

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### दिवाळीच्या फराळामागचं अर्थशास्त्र आणि आईचं गणित

पुढे.....

पण आश्चर्य म्हणजे... या गणितात स्वतःचा हिस्सा मात्र आई नेहमी शेवटी ठेवायची!

सगळ्यांना चकली आवडते म्हणून ती स्वतः तासन्तास चकल्या करायची. करंजी तळताना तेलाचे उडणारे थेंब हातावर पडायचे. लाडू वळताना हात दुखायचे. पण आम्ही मात्र गरमागरम चकली हातात घेऊन म्हणायचो— "आई, अजून दे ना!" आणि ती हसायची... जणू तिच्या थकव्याचं सगळं गणित आमच्या एका हसण्यात मिटून जायचं!

आज विचार केला की जाणवतं, त्या फराळामागे किती मोठं अर्थशास्त्र होतं.

आई बाजारातून वस्तू घेताना पैशाची काटकसर करायची. पण प्रेम देताना कधीच हिशेब ठेवायची नाही.

रवा किती? बेसन किती? तेल किती?

याचं मोजमाप असायचं...

पण— मुलांसाठीचं प्रेम किती?

शेजाऱ्यांसाठी आपुलकी किती? पाहुण्यांसाठी आदर किती? याला कधीच माप नव्हतं!

दिवाळीच्या फराळाचा पहिला डबा नेहमी आपल्या घरासाठीच असेल असं नाही. आई म्हणायची—

"पहिल्यांदा काकूंकडे देऊन ये."

"त्या आजी एकट्या राहतात, त्यांच्यासाठी दोन करंज्या ठेव." "समोरच्या घरात नवीन लोक आलेत, त्यांनाही देऊन ये." तेव्हा आम्हाला वाटायचं, इतका कष्ट करून केलेला फराळ दुसऱ्यांना का द्यायचा? पण आज समजतं...

आई फराळ देत नव्हती, ती नाती जपत होती!

एका डब्यात चकल्या असायच्या, पण त्यात आपुलकी भरलेली असायची.

करंज्या असायच्या, पण त्यात आठवणी गुंडाळलेल्या असायच्या.

लाडू असायचे, पण त्यात प्रेमाची गोडी असायची.

आजच्या दिवाळीत आपण फराळ विकत आणतो. सुंदर डब्यात पॅक केलेला, नीटनेटका, आकर्षक! पण कधी कधी तो डबा उघडताना मन मात्र रिकामं वाटतं.

कारण चव असते... पण हाताची ऊब नसते.

पदार्थ असतात... पण आठवणींचा सुगंध नसतो.

गोडवा असतो पण आईच्या प्रेमाची मिठास नसते.

खरं तर दिवाळीच्या फराळाचं अर्थशास्त्र खूप सोपं आहे.

पैसे कमी असले तरी प्रेम भरपूर असावं. पदार्थ कमी असले तरी वाटण्याची वृत्ती मोठी असावी. घर लहान असलं तरी मनाचं दार उघडं असावं.

"आई, यंदा फराळ आपण दोघं मिळून करूया..."

कारण...

फराळ फक्त खाण्यासाठी नसतो,
तो आठवणी जपण्यासाठी असतो.
फराळ फक्त पदार्थांचा नसतो, तो नात्यांचा असतो.
आणि आईचं गणित...ते कधीच पैशांचं नसतं.
ते नेहमी माणसांचं असतं!

या दिवाळीत घरात फराळ नक्की करा...

पण त्याहून महत्त्वाचं—

एखाद्या शेजाऱ्याला एक डबा द्या,
एखाद्या एकट्या व्यक्तीला घरी बोलवा,
आणि आईच्या हातावर प्रेमाने हात ठेवा.

# शाळेत वेगवेगळे उपक्रम राबविणारे जमदाडे सर (भाग २)


**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

परंतु जमदाडे यांनी ती माहिती काढून आदितीचा फॉर्म ऑनलाइन भरला. तिची लेखी चाचणी झाली. पुढं तिला मुलाखतीसाठी पुण्याच्या ठिकाणी बोलवण्यात आलं आणि पुण्याच्या पाषाण या ठिकाणी आदितीची तोंडी मुलाखत झाली. मुलाखत घेत असताना पुढे त्या स्कॉलरशिप विषयीची माहिती सांगितली गेली. आदितीची मुलाखत घेताना इंग्रजीमध्ये कुटुंबाची माहिती, गावाची माहिती इत्यादि माहिती विचारलेली होती. त्यानंतर स्कॉलरशिप साठी निवड करणारी समिती आदितीचे घर पाहण्यासाठी नागेवाडी गावामध्ये आली आणि नंतर तिला मग स्कॉलरशिप मंजूर झाली. पुढे तिला स्कॉलरशिप मंजूर झाल्यानंतर ती जेव्हा बारावी मध्ये होती त्यावेळेला तिच्याकडे क्लासेस लावण्यासाठी पैसे नव्हते म्हणून इन्फोसिस कंपनीने तिला टॅब उपलब्ध करून दिला आणि त्या टॅबच्या माध्यमातून ऑनलाईन क्लासेस आदितीला अटेंड करता आले आणि म्हणूनच ती पुढं आपले मेडिकल फार्मसी शिक्षण पूर्ण करू शकली.

साधना मासिकातील जाहिरात जमदाडे सरानी त्यांच्या गावातील एक गरीब मुलगा प्रतीक बामणे असे त्याचे नाव होते त्याच्या वडिलांना याची माहिती सांगितली. त्यांनी सुद्धा तो फॉर्म भरलेला होता आणि आदिती बरोबर त्याला सुद्धा स्कॉलरशिप मिळाली होती. आज तो सुद्धा एका बँकेमध्ये नोकरी करीत आहे. त्याची निवड स्पर्धा परीक्षेतूनच झालेली आहे. पुढे पुढे ही विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप आणखीन आमच्या शाळेतील दोन मुलींना मिळालेली होती.

जमदाडे सरांची छोटी मुलगी विश्वांजली चौथीला स्कॉलरशिपमध्ये राज्यात सहावी आलेली होती. पुढे ५ वी साठी ती सुद्धा नवोदय विद्यालयासाठी निवडली गेली. शिवांजली जी आमच्या शाळेत ८ वीत शिकत होती तीला सुद्धा इयत्ता नववी मध्ये नवोदय मध्ये प्रवेश मिळाला. तिने जेव्हा आपली लहान



बहीण अभ्यास करून नवोदय या ठिकाणी जाऊ शकते, तर आपण का जाऊ शकत नाही? हा एकच ध्यास घेऊन तिने आठवी मध्ये लोकमंगल मध्ये असताना भरपूर अभ्यास केला आणि वर्षाच्या शेवटी नवोदयची परीक्षा दिली आणि त्याच्यामध्ये ती सिलेक्ट झाली. जमदाडे सरांच्या तिन्ही मुली नवोदय विद्यालयात निवडल्या गेल्या ही दुर्मिळ घटना असावी.

जमदाडे सरांची पहिली मुलगी जेव्हा नवोदयला लागली त्यावेळेला त्यांना साहजिकच वाटलं की आपल्या मुलींच्या शिक्षणासाठी आपल्याला आता वेळ द्यावा लागणार नाही. त्यांनी लोकमंगल शाळेतील मुलांच्यासाठी जादा वेळ खर्च करावा या भावनेने प्रेरित होऊन शाळेमध्ये अनेक उपक्रम राबवण्याचे ठरवले. त्याच्यामध्ये चित्रकला ग्रेड परीक्षेमध्ये मुलांना बसवणे हे काम त्यांनी केले. सुरुवातीच्या काळात जमदाडे सरांची चित्रकला शाळेमध्ये असताना चांगली नव्हती. त्यांना चित्रकला ग्रेड परीक्षा विषयी माहिती नव्हती. परंतु नंतर इतर ठिकाणी माहिती घेऊन मुलांना चित्रकला ग्रेड परीक्षेला त्यांनी बसविले. मुलांच्याकडून ते चित्र काढून घेऊ लागले आणि पुढे एक दोन वर्षातच आमच्या विद्यालयाचा चित्रकला स्पर्धेचा शंभर टक्के निकाल लागू लागला. अनेक विद्यार्थ्यांनी ए ग्रेड आणि बी ग्रेड मिळवली. शाहूपुरी विद्यालयात एक विद्यार्थी चित्रकलेचे शिक्षक आहे त्याचं नाव दशरथ खंडझोडे आहे.

आणि मग जमदाडे सरांना एक आत्मविश्वास निर्माण झाला की, आपण कोणतेही गोष्ट त्या ठिकाणी जरी प्रॉपर नॉलेज आपल्याकडे नसेल तरीसुद्धा ती गोष्ट ज्ञान मिळवून आपण करू शकतो. मग पुढे मी जमदाडे सरांना महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेसाठी विद्यालयातील मुला-मुलींना घेऊन बालनाट्य बसवा असे सांगितले. यामध्येही त्यांनी यश मिळविले. जमदाडे सरांनी एक इंग्रजी नाटक सातारा येथील शानबाग स्कूल या ठिकाणी स्पर्धे साठी नेले. आणि आश्चर्याची गोष्ट या इंग्रजी नाटकासाठी आम्हाला जवळजवळ पाच ट्रॉफी त्या ठिकाणी मिळालेल्या होत्या. आणि मग इथून पुढे महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेमध्ये आम्ही दरवर्षी त्या ठिकाणी भाग घेऊ लागलो ज्याचे नियोजन जमदाडे सर करायचे. त्या ठिकाणी आजपर्यंतची १७ बालनाट्ये जमदाडे सर यांनी दिग्दर्शित केलेली आहेत. इंग्रजी विषयाचा निकाल म्हटलं की प्रत्येकाला विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भीती वाटते परंतु जमदाडे सर आमच्या विद्यार्थ्यांना भीती न वाटता इंग्रजी कसे शिकावी हेच ज्ञान उपलब्ध करून देतात. आमच्या लोकमंगल हायस्कूल नागेवाडी-कुशी या विद्यालयामध्ये विद्यार्थी कुठलेही खाजगी क्लासेसला जात नसताना सुद्धा विद्यालयाचा निकाल हा शंभर टक्के लागलेला आहे आणि लागत आहे याचे श्रेय हे त्या शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक शशिकांत जमदाडे आणि इतर शिक्षकांना आहे. गीतांजली शशिकांत जमदाडे ही संगणक इंजीनियर म्हणून क्वॉलफॉन टेक्नॉलॉजी सेंटर या अमेरिकन कंपनी मध्ये जॉब करते तर विश्वांजली शशिकांत जमदाडे 'इनटीसी' मधून इंजीनियर करीत आहे. आणि नुकतीच शिक्षिका म्हणून निवड झालेल्या शिवांजली शशिकांत जमदाडे ला तिच्याच ओझर्डे या गावी शिक्षिका म्हणून नेमणूक मिळाली आहे.




असे शशिकांत जमदाडे यांच्यासारखे शिक्षक मराठी माध्यमांच्या शाळांकडे विद्यार्थी नक्कीच आकर्षित करतील असा आपण विश्वास बाळगुया.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन : स्वातंत्र्याच्या ज्योतीने उजळलेली मराठवाड्याची भूमी

## १७ सप्टेंबर : संघर्ष, त्याग, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याला अभिवादन ; तहसीलदार चंद्रकांत शेळके

**ज्योतिर्मय साहित्य**

१७ सप्टेंबर हा मराठवाड्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. हा दिवस असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचा, संघर्षाचा, धैर्याचा आणि स्वाभिमानाचा जागर करणारा आहे. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानाचा भाग असलेला मराठवाडा निजामाच्या राजवटीत होता. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यानंतरही मराठवाड्याला मुक्तीसाठी संघर्ष करावा लागला. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले आणि मराठवाड्याच्या मुक्तीचा ऐतिहासिक क्षण साकारला.

**स्वातंत्र्याची आस आणि जनतेचा संघर्ष**

स्वातंत्र्याची भावना मराठवाड्याच्या जनतेच्या मनात आधीपासूनच प्रबळ होती. शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक, कामगार, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक या संघर्षात सहभागी झाले. स्वातंत्र्य हा केवळ राजकीय अधिकार नसून माणसाच्या सन्मानाचा आणि स्वाभिमानाचा अधिकार आहे, ही भावना अधिक दृढ होत गेली.

हैदराबाद मुक्तिसंग्रामात स्वामी रामानंद तीर्थ यांनी महत्त्वपूर्ण नेतृत्व केले. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी जनतेला संघटित




केले. गोविंदभाई श्रॉफ, आ. कृ. वाघमारे, अनंतराव भालेराव, बाबासाहेब परांजपे, माणिकचंद पहाडे यांच्यासह असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी या लढ्यात योगदान दिले. अनेकांनी तुरुंगवास, अन्याय आणि अत्याचार सहन केले; तर काहींनी आपल्या प्राणांची आहुती दिली.

**रझाकारांचा काळ आणि जनतेचा प्रतिकार**

हैदराबाद संस्थानातील परिस्थिती अधिक संघर्षपूर्ण बनली. रझाकारांच्या कारवायांमुळे अनेक भागांत भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र या परिस्थितीतही जनतेच्या मनातील स्वातंत्र्याची ज्योत विझली नाही. तरुणांनी 'वंदे मातरम्'च्या घोषातून राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली. विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवून मुक्तिसंग्रामाला बळ दिले.

जुलूमाची रात्र कितीही लांब असली, पहाट कधीच थांबत नाही. वीरांच्या त्यागामुळेच, स्वातंत्र्याची ज्योत तेवत राहते.

**१३ ते १७ सप्टेंबर १९४८ : निर्णायक पर्व**

हैदराबाद संस्थानाच्या विलिनीकरणाच्या अंतिम टप्प्यात १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने लष्करी कारवाई सुरू केली. या कारवाईला 'ऑपरेशन पोलो' असे संबोधले जाते. काही दिवसांच्या कारवाईनंतर १७ सप्टेंबर रोजी निजामाने शरणागती पत्करली आणि हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. मराठवाड्याच्या दीर्घ संघर्षाचा हा ऐतिहासिक शेवट आणि नव्या पर्वाची सुरुवात ठरली.



चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

ही माती वीरांची,
ही भूमी त्यागाची,
ही गाथा स्वाभिमानाची,
ही कहाणी स्वातंत्र्याची.
स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी

१७ सप्टेंबर हा केवळ इतिहासाचे स्मरण करण्याचा दिवस नाही, तर स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. आज आपल्याला मिळालेले संविधानिक अधिकार, शिक्षणाचे स्वातंत्र्य, लोकशाही व्यवस्था आणि समानतेची मूल्ये यांचा आदर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

आजच्या पिढीने मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास जाणून घेतला पाहिजे. आपल्या परिसरातील स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याची माहिती घेतली पाहिजे आणि त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेत लोकशाही, समता, बंधुभाव आणि सामाजिक न्यायाची मूल्ये पुढे नेली पाहिजेत.

स्वातंत्र्याची ज्योत सदैव तेवत राहो

१७ सप्टेंबर म्हणजे संघर्ष, त्याग, विजय आणि मराठवाड्याच्या स्वाभिमानाची ओळख आहे. ज्यांनी स्वातंत्र्याची ज्योत पेटवली, ती पुढील पिढ्यांनी जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

मराठवाड्याच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन! त्यांच्या शौर्याला सलाम आणि त्यागाला शतशः नमन.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !

****

# के सेरा सेरा...!!

**ज्योतिर्मय साहित्य**




मानव हा चिंतनशील वैचारिक प्राणी आहे. अवती भोवती दिसत आणि ऐकू येत असलेल्या सर्व भौतिक अभौतिक स्पर्शमयी तसेच गंधयुक्त गोष्टीं विषयी त्याचे मनात कुतूहल अनादी कालापासून आहे. रहस्यमयी विश्वाचा उलगडा करण्यासाठी त्याचे मन पूर्वीपासूनच जिज्ञासू राहिलेले आहे. भूत भविष्य आणि वर्तमान या तिन्ही कालातील घडीत व अघडीत बाबींचा शोध घेण्याचा तो सातत्यपूर्ण प्रयत्न करु लागला, महत्वाचे म्हणजे त्याचे मनात असलेलं भविष्यातील प्रसंगाचे आकर्षण नी काल प्रवाहाचे गूढ गर्भित अनुत्तरित संक्रमण आणि असल्या जिज्ञासे पोटीच तो प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मग इतरांना प्रश्न करु लागला.

भविष्यातील घटनेच्या आगावू माहीती बाबत अनेक विचारधारा आहेत. फलज्योतिष, राशिभविष्य, हस्तरेखा, अंक शास्त्र असे कितीतरी अभ्यास शाखा प्रचलित आहे. अनेक दावे प्रतिदावे सुध्दा आहेत, पण हे सर्व अती अगम्य गूढ गर्भित जरी असले तरी मनाला आकर्षित करते, अनाकलनीय असलेली ग्रहगोल परिभ्रमणीय स्थिती तर अंगाला घाम फोडते. हातावरील रेषा, शंख चंक्र आणखीही बरेच काही भविष्य तुमच्या हातात आहे, याची प्रचिती देतात पण मुठीत असूनही ते समजत नाही. पुर्वी पक्षांचे म्हणजे पोपटाचे माध्यमातून भविष्य सांगणारी मंडळी आढळायची, आता मात्र ती दिसून येत नाही. एकंदरीत भविष्यातील अगम्य असलेले विश्व जाणून घेणं सर्वांनाच उत्कंठावर्धक व मनोरंजक भासतं हे तेवढं मात्र अगदी खरं वास्तविक सत्य आहे. जनसामान्यास भावलेल्या भविष्यावर आधारित असे सर्वच प्रकारचे साहित्य अतिशय लोकप्रिय झालेले आहे. भविष्यातील संकल्पनेवर आधारित असलेलं असेच एक गीत या प्रसंगी आजही आठवणीत आहे, मनातील कोपऱ्यात दडलेलं हे गाणं निवांत क्षणी अवचित ओठावर येवून मग कानावर गुंजारव करायला लागतं व मन गुरफटून जात.




प्रतिभावंत हॉलीवूड चित्रपट निर्माता व दिग्दर्शक आल्फ्रेड हिचकाक यांचे अ मैन न्यूज टू मच, या रहस्यमयी व रोमांचकारी चित्रपटातील, ''के सेरा सेरा,'' हे डोरीस डे यांनी गायलेलं नी साभिनय साकारलेलं हे गाणं भविष्यातील घटने बाबत अतिशय वास्तविक सत्य उजागर करतं. साधे सरळ आणि सहज सुलभ असलेलं हे सुंदर गाणं आजही मन मोहीत करुन मनातील असलेल्या विचारांचे निराकारण करायला प्रभावी आणि सक्षम भासते. चित्रपटातील हे गाणं मग केवळ चित्रपटातील न राहता सोबतच मानवी जीवनाचं सुध्दा एक गाणं होऊन राहातं व जेव्हा कधी कानावर पडतयं तेव्हा मनाला एका विशिष्ट भावविश्वात घेऊन जातं. स्वैर मनाला जागवतं, भरकटलेल्या विचारांना आरसा दाखवतं.

व्हेन आय वाझ जस्ट अ लिटल गर्ल

आय आस्क माय मदर व्हाट विल आय बी

विल आय बी प्रिटी विल आय बी रिच
हिअर्स, व्हाट शी सेड टू मी

लहान मुलांच विश्व अनुकरणीय आणि भावनात्मक असतं. आकाशातील सूर्य, चंद्र, तारे परिसरातील निसर्गाचे विविधांगी रंग बघितल्यावर त्यांचे मनात निरनिराळे तरंग उठतात. आताही आठविते, आमचे लहाणपणी उन्हाळ्यात अंगणात झोपत असू त्या वेळी आकाशातील सप्तर्षी तारका समूह दाखवून आजी आम्हाला ते बुढीच खाटलं आहे अस सांगायची, अर्थातच आजी तिच्या कल्पनेच्या अनुषंगाने कथा आणि कल्पना फुलवित असायची. लहान मुलं जे बघतात अनुभवतात त्यांच स्पष्टीकरण आईला विचारतात, आणि ते नैसर्गिकच आहे, आई प्रथम गुरू आहे, असं जे म्हणतात उगीचचं नाही. आईच्या पाऊलावर टाकीत मुलं पहिलं पाऊल टाकतात, आईच त्यांच्या पंखाला बळ देते, झेप घायला आणि उडायला शिकवते, जगाची वहिवाट दाखविते.

डोरीस डे यांच्या गाण्यातील, के सेरा सेरा, व्हाट एव्हर विल बी विल बी, मधील पहिले दोन चरण हेच सुचवितांना दिसतात. कवियित्री लहान असतांना आईला उत्सुकतेनं विचारते. आई खरोखरचं मी सुंदर होईल कायं ग, आणि खूप खूप श्रीमंत सुध्दा, सांग ना गं.

अर्थातच बालिश मनास भविष्यातील असे अनेक प्रश्न पडतात. मी परिक्षेत पास होईल काय, छान छान कपडे मिळतील कायं, अश्या अनेक प्रश्नांची आशा आकांक्षा मनामध्ये सतत येत राहते. बालमनाला सुंदरता खूप भावते, जे जे सुंदर असतं ते खरोखरच चांगल असतं अशी त्यांची धारणा असते, कारण बालपणीचं सुंदरच विश्व आई वडील त्याचे समोर ऊभं करतात. त्यामुळे मोठं झाल्यावर कुणी आपल्याला सुंदर म्हणावं, अशी त्यांची मनिषा किंबहुना सुप्त इच्छा असते. तसेच मुलं मोठ होतांना त्यांचा जगाशी संपर्क येतो, तेव्हा त्याचे लक्षात येतं सर्व उपभोगी वस्तू आणि व्यवस्था व सुविधा पैशांनी प्राप्त होतात. पैसा हा सर्वश्रेष्ठ असतो असे त्यांचे मनावर समाजातील राहणीमान अप्रत्यक्ष बिंबवते आणि मग यामधूनच आपण श्रीमंत असायला हवं अस त्यांना वाटायला लागतं.

(क्रमशः)


# आदरणीय गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनील कुमार

लेखिका: डॉ मीना श्रीवास्तव ठाणे मो. 99201 67211





पुढे....
याशिवाय त्यांनी सहाय्यक गायक आणि वादकांच्या सर्वोत्तम संचाला पाचारण केले होते.
कार्यक्रमानंतर आशा मॅडमच्या चेहऱ्यावर अतीव समाधान आणि हायसे वाटल्याच्या संमिश्र भावना दिसत होत्या. मी त्यांना अनेकदा दूरून पाहिले होते, उत्साही विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी त्यांना घेराव घातलेला असायचा. जर एखादी माजी शिष्या त्यांना भेटायला आली, तर तिने प्रशिक्षण का सोडले हा प्रश्न बाजूला सारून, त्या तिला सहजपणे कवेत घेऊन तिच्या गालाचे हलकेच चुंबन घेत घ्यायच्या आणि सद्गतीत होत आपल्या माजी शिष्येवर प्रेमाचा वर्षाव करायच्या.
अनुभूतीच्या कार्यक्रमानंतर मात्र या महान व्यक्तिमत्त्वाशी वैयक्तिक संवाद साधण्यासाठी भेट घेण्याचा मोह मला आवरता आला नाही.
अखेरीस, ईश्वरेच्छेने आणि गुरु आशा मॅडमचे अत्यंत व्यस्त वेळापत्रक असूनही त्यांनी वेळ दिल्याने हा योग्य योग जुळून आला.
माझ्यासाठी अत्यंत नवलाची गोष्ट म्हणजे, ही सुखद भेट अगदी अनौपचारिक आणि आपुलकीने ओतप्रोत होती. इथे त्या महान नाट्याचार्या आपल्या आयुष्याची काही पाने उलगडून, आपले अनमोल विचार माझ्यासमोर निःसंकोचपणे मांडत होत्या.
कदाचित मी वयाने ज्येष्ठ असल्यामुळे मला या कला-विदुषीला मोकळेपणाने प्रश्न विचारता आले. एक रोमांचक माहिती मिळाली, त्या मल्याळी असूनही, त्यांचा जन्म आणि संगोपन मुंबईत झाले.
जन्मजात अस्सल मुंबईकर असलेल्या या कलावतीने वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी 'श्री राजराजेश्वरी भरत नाट्य कलामंदिर, मुंबई' चे 'कलैममणी' गुरू टी. के. महालिंगम पिल्लई यांच्या मार्गदर्शनाखाली भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. तिने मुंबईतील 'नालंदा नृत्यकला महाविद्यालय' येथून पदवी प्राप्त केली. या औपचारिक नृत्य प्रशिक्षणानंतर गुरु आशा यांनी आपली स्वतःची अशी अनवट वैशिष्ट्यपूर्ण शैली विकसित केली. पारंपरिक नृत्यशैलीच्या अभिव्यक्तीचा विस्तार करण्यासाठी पूर्णपणे समर्पित असलेल्या या नृत्यांगनेला सलग दहा वर्षे 'राष्ट्रीय शिष्यवृत्ती' (नॅशनल स्कॉलर) मिळवण्याचा मान मिळाला आहे. त्यानंतर त्यांना अनेक सन्मान प्राप्त होत गेले;
(क्रमश:)







भाद्रपद शुक्ला षष्ठी, { दिनांक १७ सप्टेंबर २०२६}

## द्वितीय आत्मधर्म : उत्तम मार्दव धर्म

आत्म स्वभावा मध्ये मान किंवा अभिमानाच्या अभावाने शांती स्वरूप अवस्था उत्पन्न होणे यास उत्तम मार्दव (मृदुता) असे म्हणतात.

_मृदोर्भाव: मार्दवम_ अर्थात् मृदुभाव उत्पन्न होणे, कठोरतेच्या अभावाने मृदुता उत्पन्न होते. कठोरतेचा अभाव होण्यासाठी विनम्रता,विनय देखील अत्यंत आवश्यक आहे. संसारामध्ये व्यवहार करत असताना मनुष्य अनेक प्रकारचा मान अभिमान किंवा गर्व बाळगतो.

व्यक्ती साधारणपणे आठ प्रकारचा गर्व किंवा मान बाळगतो असे मूळ शास्त्रात विधान आहे. ते म्हणजे जाती, कुल, विद्या, बल, ऐश्वर्य, रुप, तप आणि धन. यांना मनुष्य स्वतःचे स्वरूप जाणून त्या विषयी अत्यंत गर्व करतो. आणि त्यामुळे स्वभावात एक प्रकारची आखड किंवा कठोरता निर्माण होते. यामुळे अनेक प्रकारचा अध्यात्मिक तसेच व्यावहारिक विनाश होतो.

मान अभिमान किंवा गर्व होऊ नये आणि त्यामुळे व्यावहारिक आणि आध्यात्मिक विनाश होऊ नये यासाठी विनय धारण करावा. हेच धर्म तत्त्वज्ञानाचे मूळ आहे. ज्ञान आणि अनेक सदगुणांची प्राप्ती व्हावी,जगात कीर्ती निर्माण व्हावी, कोणीही आपल्याशी वैर करू नये या गोष्टीची आवश्यकता भासत असेल तर गर्व सोडून विनयशील व्हावे.

मृदुता येण्यासाठी गर्व, अहंकार नाहीसा झाला पाहिजे. त्याशिवाय विनम्रता, वचन माधुर्य, पूज्यता, दान, सन्मान यापैकी एकही गुण प्राप्त होणार नाही. गर्विष्ठ व्यक्तीला कारणाशिवाय शत्रू उत्पन्न होतात. त्याची सर्वत्र निंदा होते. सर्वांना त्याची मानखंडना व्हावी असे वाटते.

निरभिमानी व विनयशील व्यक्ती आपली सर्व कार्य गुरुच्या आदेशानेच करत असतात. विनय गुणानेच मृदूतेचा विकास होतो. आणि उत्कृष्ट अशा दशलक्षण आत्म धर्मा पैकी उत्तम मार्दव धर्म याची प्राप्ती होऊन आत्मसमृद्धी उत्पन्न होते.

बलराज संघई, छत्रपती संभाजीनगर 9420015208

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# मानवतावादी शिक्षण देणारी मुलींची शाळा जि. प. कन्या प्रशाला आष्टी

ज्योतिर्मय साहित्य

निजाम राजवटीचे शेवटचे टोक म्हणजे बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका. सतत दुष्काळग्रस्त भाग म्हणून हा भाग ओळखला जातो. आजही या ठिकाणी पाणीटंचाईला तोंड द्यावे लागते. अशा भागात मराठवाडा मुक्ती संग्राम यशस्वी झाल्यानंतर शैक्षणिक सुधारणांचे वारे वाहू लागले. स्वामी रामानंद तीर्थ, साने गुरुजी यांच्या विचारातून राष्ट्रीय हित महत्त्वाचे मानून या भागात विशेषतः मुलींच्या शिक्षणाची दारे उघडली गेली.

इस १९५० साली शैक्षणिक क्षेत्रात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या होत्या, त्या म्हणजे नांदेड या ठिकाणी स्वामी रामानंद तीर्थ यांनी पीपल्स कॉलेजची स्थापना केली तर छत्रपती संभाजीनगर (पुर्वीचे औरंगाबाद) या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद कॉलेजची स्थापना केली. शैक्षणिक क्रांती ही स्वातंत्र्य चळवळी एवढीच महत्त्वाची आहे, हे त्या काळातील समाजसुधारकांनी ओळखले होते. त्यामुळेच भारत देशासाठी शैक्षणिक गुणवत्ता, उत्तम दर्जाचे ज्ञान असलेल्या शाळा आणि शिक्षण संस्था महत्त्वाच्या आहेत, असे लक्षात आल्यानंतर ठिकठिकाणी तळागाळातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरू करण्यात आल्या.

मराठवाड्यातील आंबेजोगाई येथील योगेश्वरी शाळा याचे महत्वाचे उदाहरण. निजाम काळामध्ये उर्दू भाषेतून शिक्षण दिले जात असे. परंतु मुक्ती लढ्याने मराठी भाषेतून शिक्षणाला महत्त्व दिले. त्यातून राष्ट्रीय ऐक्य हे ध्येय समोर ठेवून शैक्षणिक क्रांती होण्यास सुरुवात झाली.

बीड जिल्ह्यात आष्टीसारख्या दुष्काळग्रस्त तालुक्यात शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे म्हणून येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी कार्य करण्यास सुरुवात केली. मुलींची स्वतंत्र शाळा याच माध्यमातून सुरू झाली. ही शाळा त्या काळात जुन्या तहसीलसमोर भरत असे. हळूहळू शाळेमध्ये मुलींची संख्या वाढू लागली. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे या साने गुरुजींच्या प्रार्थनेने शाळेतील वातावरण मानवतावादाच्या संस्काराने भावले जात असे जात असे.

जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी या शाळेची सुरुवात १९५२ मध्ये झाली. इस १९५६ पासून शैक्षणिक घडामोडीला गती मिळाली. सुरुवातीला शाळा पहिली ते सातवी या वर्गांपूरती मर्यादित होती. पुढे साधारणतः १९६२ पासून आठवीचा वर्ग सुरू झाला व पुढील काळात नववी आणि दहावीचा वर्ग या शाळेत सुरू झाला. अशा पद्धतीने आष्टीमध्ये मुलींची सरकारी शाळा पहिली ते दहावीपर्यंत यशस्वीपणे शिक्षण देण्यासाठी सज्ज झाली.

ही शाळा आष्टी गावासाठीच नव्हे तर आष्टी तालुक्यातील आजूबाजूच्या वाडी, तांडे, खेडेगावातील मुलींच्या शिक्षणासाठी वरदान ठरली. शाळा मुलींचीच असल्यामुळे पालकही आपल्या मुलींना शाळेत पाठवू लागले. वाढत्या आधुनिकीकरणाच्या झळा आष्टीला तोपर्यंत बसल्या नव्हत्या.

दुष्काळग्रस्त भाग असला तरी माणुसकी जिवंत असलेली आष्टी होती. त्यामुळे मुलींना एकटीला गावातून दूरवर असलेल्या शाळेत पाठवण्यासाठी पालकांना कसलीच भीती वाटत नव्हती. चार, सहा किलोमिटर पायी चालत मुली शिक्षण घेण्यासाठी येत. पालकांना ही शाळा मुलींच्या शिक्षणासाठी अत्यंत सुरक्षित ठिकाण वाटत होते. त्यामुळे याठिकाणी हळूहळू मुलींचे शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढू लागले, सुरुवातीला प्रत्येक वर्गाची एक तुकडी होती. नंतर प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्या सुरू झाल्या. साधारणत: १९९० नंतर तीन तुकड्या सुरू झाल्या. एकूणच मुलींच्या शिक्षणासाठी संपूर्ण आष्टी तालुक्याने कंबर कसली होती. प्रत्येक वर्गात ४०-४५ मुली असायच्या.

महाराष्ट्रातील शाळा कशा असाव्यात? त्या शाळेमध्ये कोणते अभ्यासक्रम असावेत? मुली आणि मुलांच्या शाळेसंदर्भातील कोणते निकष लावावेत, याबाबत शासनाच्या वतीने विविध समित्यांचे गठन होऊ लागले. त्यात जे.पी. नाईक यांचे कार्य महत्त्वाचे आहे. राधाकृष्णन आयोग (१९४८) हा या शैक्षणिक वाटचालीसाठी महत्त्वाचा होता. मुलींनी कोणत्या प्रकारचे शिक्षण घ्यावे? यासंदर्भात विशेष तरतुदी यात केल्या होत्या. स्त्रीशिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे व त्या प्रकारचा अभ्यासक्रम असणे. याला आयोगाने स्थान दिले. त्याचप्रमाणे मुदलियार आयोग, दुर्गाबाई देशमुख आयोग यांनी देखील मुलींना कोणत्या पद्धतीचे शिक्षण देण्यात यावे याबाबत विशेष सूचना सांगितल्या. राष्ट्रीय स्त्री शिक्षण समिती १९५८-५९ यांनी असे सुचवले की लोकशाही समाजात लैंगिक भेदानुसार मुलांसाठी आणि मुलींसाठी वेगळे अभ्यासक्रम ठेवता येणार नाहीत. भरतकाम, विणकाम, गृहविज्ञान हे मुलींचेच आहे असे मानून मुलींना याबाबतीत सक्तीचे शिक्षण दिले जाऊ नये.

शिक्षण क्षेत्रात शासन पातळीवरील विविध समित्यांच्या मार्गदर्शनानुसार आष्टीची जिल्हा परिषद कन्या प्रशाला ही सावित्रीच्या लेकींना शिक्षणाचे नवे दालने उघडे करू पाहत होती. विद्या विनयेन शोभते हे बिद्रवाक्य ठेवून या शाळेने हजारो मुलींच्या उज्वल भविष्याला आकार दिला. त्यातील मीही एक आहे.






या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे या शाळेला लाभलेली तळमजल्यासहित तीन मजली इमारत; तेही सरकारी जिल्हा परिषद शाळेची. मुलींच्या शिक्षणासाठी उभी राहिलेली ही इमारत त्या काळातील सरकारी शाळेची भव्य इमारत असावी.

या इमारतीत कार्यालयसह साधारणता २५ खोल्या होत्या. प्रत्येक वर्ग ४०० स्केअर फुटापेक्षा मोठा असेल. जवळपास दोन ते तीन एकरचा परिसर या शाळेला लाभला. खेळाचे मोठे ग्राउंड या शाळेला लाभले होते.

आयुष्याची दहा वर्ष या शाळेच्या मायेच्या कुशीत मी वाढले. खऱ्या अर्थाने मानवतावादी शिक्षण मला या शाळेने दिले. जिथे जाती-भेदाच्या, गरीब- श्रीमंतीच्या भिंती गळून पडल्या होत्या. शिकवणे हे महत्त्वाचे मानून शिक्षकांनी प्रामाणिकपणे शिकवले. अडचणीमध्ये मार्गदर्शन केले. जास्तीचे तास घेतले. खेळाचे कराळे सर, मराठीचे भागवत सर, सुनिता उगले मॅडम, गणिताचे घोडके सर, विज्ञानाचे कासले सर, इंग्लिशच्या मनीषा भागवत मॅडम, इंग्लिशचे डी.जे. देशपांडे सर, मुळे सर, काटेकर बाई, निकाळजे सर, जोशी मॅडम, चित्रकलेचे साळवे सर, सुपेकर सर, सुकन्या मॅडम, मंत्री मॅडम, पटेल मॅडम, जैन मॅडम, गृहविज्ञान शिकवणाऱ्या गव्हाणे मॅडम, ताटे मॅडम, सूर्यवंशी सर आणि त्या काळातील दोन मुख्याध्यापक डी. जे. देशपांडे सर आणि नसरीन तांबोळी मॅडम या सर्व शिक्षकवृंदानी आम्हाला घडवले. आमचे बालपण मुक्तपणे आम्हाला उपभोगू दिले. त्याचबरोबर यशस्वी उज्वल भविष्यासाठी शिक्षणाचे बाळकडू पाजले.

शाळेमध्ये विद्यार्थिनींसाठी तिच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व उपक्रम व्यवस्थितपणे राबवले जात असत. शाळेची प्रयोगशाळा मला फार आवडत असे. प्रयोगासाठी लागणारी सर्व उपक्रमे, रसायने असलेली सुसज्ज अशी प्रयोगशाळा या शाळेला मिळाली होती. साधारणता वीस बाय तीस फुटाची प्रयोगशाळा असावी. तिथे प्रत्यक्ष जाऊन आमच्याकडून कासले सर, सुपेकर सर प्रयोग करून घ्यायचे. शाळेत छोटी बँक होती. जी विद्यार्थिनी चालवत असत. चित्रकला, गायन, वादन, नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम देखील खूप छान पद्धतीने या शाळेत घेतले जात. खो-खो, टेबल- टेनिस, फुटबॉल, हॉलीबॉल, शटलकॉक यासारख्या खेळांची प्रॅक्टिस कराळे सर आमच्याकडून करून घेत. ज्या विद्यार्थिनींना यात सहभाग घ्यायचा असे त्यांना सहजपणे सहभागी करून घेतले जात असे. कुठल्याही प्रकारचे राजकारण या ठिकाणी नसे. त्यामुळेच या शाळेतील मुलींनी नॅशनल, स्टेट लेव्हलला पारितोषिके पटकावली होती. जास्तीचे तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण केला जात असे. याकारणामुळे प्रत्येक वर्गातील साधारणतः ६० ते ७०% मुली आज आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. या शाळेत शिक्षण घेतलेल्या अनेक मुली प्राध्यापिका झाल्या, शिक्षिका झाल्या, पी.एस.आय, ए.पी.आय, वकील, डॉक्टर, इंजिनियर, उद्योजिका झाल्या. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये, तालुक्यामध्ये आज आष्टीची मुलगी सक्षमपणे जीवन जगताना दिसते आहे.




महाराष्ट्र राज्याप्रमाणे परदेशात देखील या शाळेचे नाव या मुलींनी उज्वल केले आहे. बऱ्याच मुलींना या शाळेमुळे शिक्षण मिळाल्यामुळे क्लासवन पती मिळाले. मंत्रालयात, आयुक्तालयात ते मोठमोठ्या पदांवर आपली जबाबदारी सांभाळताना दिसतात.

शाळा केवळ अभ्यासक्रमापूर्तीच मर्यादित नसते तर शाळेचे वातावरण हे देखील विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी महत्त्वाचे असते. या शाळेने दिलेले मानवतावादी संस्कार हे आज इथे शिक्षण घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थिनींना आयुष्यातील खूप मोठी शिदोरी मिळाल्यासारखे वाटतात. हेच मानवतावादी संस्कार मुलींनी आयुष्यभर जपले. आजूबाजूच्या समाजाला देखील या विद्यार्थिनी हेच मानवतावादी संस्कार देत आहेत. त्याचप्रमाणे आपली मुले देखील याच संस्कारातून त्या घडवत आहेत.

माझ्या वर्गातील माझ्या संपर्कातील सर्व मैत्रिणींची मुले ही गुणवान आहेत हे विशेष कौतुकाचे. अनेक वाडीतांड्यावरील गरीब घरच्या मुलींचे उज्वल भविष्य घडवण्यासाठी आमची शाळा ही नेहमीच सज्ज होती. आम्हा विद्यार्थिनींना नेहमीच या बाबीचा अभिमान वाटतो.

या शाळेची भव्य इमारत मोडकळीस आल्यामुळे पाडली जात आहे तेव्हा केवळ इमारतच नष्ट होत नाहीये तर आमच्या सोबतची मानवतावाची शिदोरी देखील त्यासोबत लुप्त होत आहे. या जाणिवेने प्रत्येक विद्यार्थिनीच्या डोळ्यांमध्ये आज अश्रू आहेत.

ही इमारत केवळ इमारत नाही नव्हती तर महाराष्ट्रातील मुलींच्या शिक्षणासाठीचा एक तीर्थक्षेत्र होती. जिथे गरीब घरच्या विद्यार्थिनींना नि:शुल्क, उत्तम दर्जाचे शिक्षण मिळाले. दोन - तीन एकरचा परिसर खेळाचे मोठे ग्राउंड लाभलेली ही शाळा आजच्या लाखो कोटींच्या उलाढालीत चालणाऱ्या शिक्षण व्यवस्थेसमोरचे जिथे शिक्षण संस्था ही ज्ञानाचे केंद्र असले पाहिजे बाजारीकरणाचे नाही हे सांगणारे जिवंत उदाहरण होती.

आजूबाजूच्या वाडी, तांड्यावरील मुलींसाठी आजही शाळा नाहीत. असलेल्या सरकारी शाळा विद्यार्थी संख्येअभावी बंद पडत आहेत. दुसरीकडे खाजगी शाळेत लाखो रुपये देऊन मुले मुली शिक्षण घेत आहेत. अशा या काळात मागे वळून बघत असताना माझी शाळा मला सावित्रीच्या लेकींना सक्षम बनवण्यासाठीचे, आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठीचे महत्त्वाचे माध्यम वाटते.


परंतु अशा शाळा आता पुन्हा निर्माण होतील का? हा मोठा प्रश्न निर्माण आहे. ज्यांच्याकडे पैसा नाही अशा मुलींसाठी आजच्या आधुनिकीकरणाच्या काळात दर्जेदार शिक्षणाची दारे बंद होत आहेत. हे वास्तव स्वीकारणे देखील जड होत आहे.

म. जोतिबा व सावित्रीबाई फुलेंनी मुलींच्या शिक्षणासाठी संपूर्ण जीवन अर्पण केले. त्याच सावित्रीच्या लेकींना माझ्या शाळेने घडवले. ही शाळा एक आशावादी आनंदी स्त्रीजीवनाची नांदी होती. आज अशा प्रकारच्या शाळा उघडण्यासाठी हजारो सावित्रीच्या लेकी पुढे आल्या पाहिजेत.

# श्रावणकाव्य : पावसाच्या सरींपासून मनाच्या ओलाव्यापर्यंत

ज्योतिर्मय साहित्य

श्रावण हा केवळ भारतीय ऋतूचक्रातील एक महिना नाही; तो मराठी मनाच्या भावविश्वातील एक जिवंत, चैतन्यमय आणि बहुरंगी अनुभव आहे. पाऊस, हिरवाई, मातीचा गंध, झुले, सण-उत्सव, माहेरची ओढ, नाती, भक्ती, प्रेम, विरह आणि निसर्गाशी असलेले अतूट नातेया सगळ्यांचा एकत्रित आविष्कार म्हणजे श्रावण. याच बहुरंगी श्रावणानुभवाला शब्दरूप देणारा 'श्रावण काव्य' हा संग्रह वाचकांसमोर आला आहे. महाराष्ट्रातील अनेक कवी-कवयित्रींच्या लेखणीतून साकारलेला हा संग्रह नुकताच ऍमेझॉन किंडले डायरेक्ट पब्लिशिंग च्या माध्यमातून प्रकाशित झाला आहे. प्रकाशक आहेत सुप्रसिद्ध लेखिका शीतल दरंदळे.




या संग्रहाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे एकाच विषयाभोवती ९२ कवींच्या ९२ वेगवेगळ्या संवेदना एकत्र आणण्याचा सुंदर प्रयत्न. अनुक्रमणिकेपासून शेवटच्या कवितेपर्यंत श्रावणाची अनेकविध रूपे आपल्याला भेटत जातात. त्यामुळे हे पुस्तक एखाद्या एकाच कवीच्या श्रावणानुभवापुरते मर्यादित न राहता, समूहाच्या सामूहिक श्रावण-स्मृतीचे समृद्ध काव्यदालन बनते.




निसर्गाचे हिरवे काव्य

संग्रहातील बहुतांश कवितांमध्ये श्रावणाचा पहिला आणि सहज जाणवणारा पैलू म्हणजे ''निसर्ग'' पाऊस, मेघ, धुके, हिरवाई, डोंगर-दऱ्या, नदी-नाले, रानफुले, मोर, इंद्रधनुष्य आणि मातीचा गंध यांची विपुल उपस्थिती या कवितांना निसर्गसौंदर्याची लय देते. 'श्रावण सरी'मध्ये ''रूपेरी जरी'' सारख्या सुंदर प्रतिमेतून पावसाच्या सरींचे सौंदर्य खुलते, तर 'हरितगार श्रावण'मध्ये हिरव्या निसर्गासोबत मंदिरातील घंटानाद, बेलपत्र आणि शिवभक्ती यांचा सुरेख संगम साधला आहे.

'असा श्रावण रंगारी' या कवितेत तर श्रावणाला जणू चित्रकाराचे रूप दिले आहे. मेघसरी, इंद्रधनुष्य, रानफुले, वेली आणि अंकुरणारे बीज यांच्या साहाय्याने निसर्गाच्या पुनर्निर्मितीचा आणि नवचैतन्याचा अनुभव व्यक्त केला आहे.

अशा कवितांमधून श्रावण केवळ पावसाचा काळ न राहता धरतीला नवजीवन देणारा सर्जनाचा ऋतू ठरतो.

(क्रमशः)

# EPFO वेतन मर्यादा ₹२५,००० करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचे स्वागत

## कंत्राटी व ठेका कामगारांच्या सामाजिक सुरक्षेला मोठी चालना; ५१ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना होणार लाभ

ज्योतिर्मय साहित्य

पुणे / नवी दिल्ली - कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या (EPFO) अनिवार्य वेतन मर्यादेत ₹१५,००० वरून ₹२५,००० प्रतिमहिना वाढ करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याच्या निर्णयाचे अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाने (संलग्न : भारतीय मजदूर संघ) स्वागत केले आहे. या निर्णयामुळे सुमारे ५१ लाख अतिरिक्त कर्मचारी EPFOच्या सामाजिक सुरक्षा कक्षेत येण्याची अपेक्षा असून, ठेका व कंत्राटी कामगारांसह मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, पेन्शन व विमा संरक्षणाचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन निळकंठ मेंगाळे यांनी म्हटले की, "केंद्र सरकारचा हा निर्णय देशातील कामगारांच्या सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. EPFOची वेतन मर्यादा ₹२५,००० पर्यंत वाढल्यामुळे ₹१५,००० ते ₹२५,००० या वेतन श्रेणीतील अनेक कामगारांना सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा अधिक व्यापक लाभ मिळणार आहे. विशेषतः कंत्राटी व ठेका कामगारांसाठी हा निर्णय मोठा दिलासा देणारा आहे."

कामगार संघटनांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

भारतीय मजदूर संघ (BMS) आणि अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ हे देशातील कंत्राटी व ठेका कामगारांना सामाजिक सुरक्षा, योग्य वेतन, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, विमा संरक्षण तसेच इतर कामगार हक्क मिळावेत यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.

EPFOच्या वेतन मर्यादेत वाढ करण्याची मागणी ही कामगार संघटनांकडून दीर्घकाळापासून करण्यात येत होती. EPFOच्या संबंधित समितीच्या चर्चांमध्येही ₹२५,००० वेतन मर्यादा करण्याची गरज नोंदविण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा सद्य निर्णय हा सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा विस्तार करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे महासंघाने म्हटले आहे.

निर्णयाचे प्रमुख फायदे

EPFO वेतन मर्यादेत वाढ : अनिवार्य EPFO कव्हरेजसाठीची मासिक वेतन मर्यादा ₹१५,००० वरून ₹२५,००० करण्यात आली आहे.

* ५१ लाख अतिरिक्त कर्मचाऱ्यांना लाभ : या निर्णयामुळे सुमारे ५१ लाख अतिरिक्त कर्मचारी EPFOच्या कक्षेत येण्याची अपेक्षा आहे.

* सामाजिक सुरक्षेचा विस्तार : पात्र कर्मचाऱ्यांना EPFबरोबरच लागू नियमांनुसार EPS आणि EDLIशी संबंधित सामाजिक सुरक्षा लाभ उपलब्ध होतील.

* निवृत्तीची आर्थिक सुरक्षा : EPF व पेन्शनमधील सहभागाचा विस्तार झाल्यामुळे पात्र कामगारांच्या दीर्घकालीन सामाजिक सुरक्षेला बळकटी मिळणार आहे.

* कंत्राटी कामगारांना विशेष फायदा : कंत्राटी कामगार हे मोठ्या प्रमाणावर ₹१५,००० ते ₹२५,००० या वेतन श्रेणीत कार्यरत असल्याने या वर्गाला या विस्ताराचा महत्त्वपूर्ण लाभ होण्याची अपेक्षा आहे.

महासंघाने केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करून कंत्राटी व ठेका कामगारांच्या सामाजिक सुरक्षेचा विस्तार, समान कामासाठी समान वेतन, कंत्राटी कामगारांचे नियमितीकरण, PF व ESIची प्रभावी अंमलबजावणी आणि कामगार कायद्यांचे काटेकोर पालन यासाठीचा आपला संघर्ष यापुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

"देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कंत्राटी व ठेका कामगारांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा मिळणे ही काळाची गरज आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाची देशभरात प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे," असे सचिन निळकंठ मेंगाळे यांनी सांगितले.

अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाने केंद्र सरकारचे आभार मानून या निर्णयाचे स्वागत केले आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त चिंधवली येथे आकर्षक देखावा

**ज्योतिर्मय साहित्य**

चिंधवली, सातारा - क्रांती सूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती निमित्त मु.पो. चिंधवली ता. वाई जिल्हा सातारा येथे दिपक पवार यांनी आकर्षक सजावटीच्या माध्यमातून (११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२८) शासनाकडून दोन वर्षाचा राष्ट्रव्यापी व राज्यस्तरीय विशेष स्मृती/जयंती महोत्सव साजरा केला जात आहे, त्याच अनुषंगाने महात्मा फुले यांच्या नेत्रदीपक कार्याचा क्रांती सूर्य मागोवा घेऊन त्यांच्या वाटचालीतील स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह, बालविवाहास विरोध आणि शेतकरी या प्रसंगाचे छोटेखानी सादरीकरण करून त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना मानवंदना देण्याचा प्रयत्न केला आहे.

महात्मा फुले हे आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांनी जातीय विषमता, अंधश्रद्धा आणि शिक्षणावरील बंधने याविरुद्ध लढा देत सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समता, सामाजिक न्याय आणि मानवी मुक्तीचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवला. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या फुले दांपत्याने शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले.




समाजप्रबोधनाच्या माध्यमातून समाजाला पूरक व पोषक संदेश देता यावा म्हणून पवार कुटुंबीयांनी आजपर्यंत गणपती सजावटीच्या माध्यमातून वृक्षारोपणा, पुस्तक प्रदर्शन, ऑनलाईन-ऑफलाईन शिक्षण व्यवस्था, महापूर, कर्मवीर भाऊराव पाटील यांची वाटचाल, सावित्रीबाई फुले यांची मुलींची पहिली शाळा, योगसाधना तसेच कृष्णा स्वच्छता मोहीम, दिपोत्सव, भव्यदिव्य रांगोळी सारखे उपक्रम तरुणाईच्या सहकार्याने राबविले होते. या आकर्षक देखाव्याची मांडणी सौ. वैशाली देवेंद्र पवार, अंजली पवार, पियुष पवार यांनी केली, यासाठी डॉ श्री माणिक काका शेडगे, अश्विनी सांगळे मॅडम यांचे विशेष सहकार्य लाभले.

# इंजिनिअरची सेवा बजावत आपली कला जोपासणारे इंजि. सुमित पेंडकर

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - आयटी इंजिनिअरिंगच्या धावपळीच्या आणि व्यस्त आयुष्यात स्वत:चा छंद जोपासणे, ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे. नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथील सॉफ्टवेअर इंजिनिअर सुमित पेंडकर यांनी पुण्यात आयटी इंजिनिअरची सेवा बजावत आपली कला जिवापाड जपली आहे, जोपासली आहे.




कामाचे दीर्घ तास आणि डेडलाइन्स चा रोजचा ताण, तरीही मनातील कलेची आवड इंजिनिअर पेंडकर यांनी जिवंत ठेवली आहे.

वेळेचे काटेकोर नियोजन करत, अनेक महिन्यांच्या अथांग मेहनतीतून गणपती बाप्पांच्या सुरेख मूर्ती साकारून त्यांना मनोवेधक रंग भरण्याचे मोठे कसब आणि कौशल्या इंजिनिअर सुमित पेंडकर यांना अवगत आहे. दिवसभराच्या थकव्यानंतरही केवळ कलेवर असलेल्या नि:स्सीम प्रेमापोटी त्यांनी या चित्रासाठी आपला प्रत्येक क्षण वेचला आहे, वेळ दिला आहे. आवड असली की सवड मिळते, याचे प्रत्यंतर त्यांच्या हातून साकारलेल्या श्रीं च्या मूर्ती पाहून येते.

मूर्तीतील बारकावे आणि जिवंतपणा त्यांच्या अखंड चिकाटीची व तळमळीची साक्ष देतात. या हृदयाचे त्या हृदयी अशा प्रकारचे कष्टातून इंजिनिअर पेंडकर यांनी अप्रतिम कलाकृती सकारल्या आहेत. त्यांची ही सेवा केवळ बाप्पाच्या चरणी समर्पित नसून, प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही.

# प्रा डॉ वि.ल धारूरकर यांना जीवन गौरव पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

शिर्डी - रेडियंट टॅलेंट रेकॉर्ड्स च्या वतीने आयोजित २६ व्या अखिल भारतीय संमेलनामध्ये व राष्ट्रीय पुरस्कार प्रसिद्ध विचारवंत व माजी कुलगुरू डॉक्टर वि.ल धारूरकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

माध्यम शिक्षण पत्रकारिता आणि इतिहास संशोधन पुरातत्त्वविद्या पर्यटन उदारकला इत्यादी क्षेत्रामध्ये त्यांनी बजावलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधनकार्यासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला हे संमेलन शिर्डी येथील हॉटेल पासो च्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते

याप्रसंगी अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनानी सेनापती नरवीर तानाजी मालुसरे यांचे अकरावे



वंशज सुभेदार कुणाल मालुसरे हे होते.

डॉ. धारूरकर यांना हा पुरस्कार छत्तीसगडचे शिक्षण तज्ञ आणि रायपूर येथील कला विद्यापीठाचे संस्थापक आणि सहकार भारतीचे माजी अध्यक्ष डॉक्टर राकेश मिश्रा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक एडवोकेट क्रांती महाजन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि आजवरच्या २६ प्रतिभा संमेलनाचा गोषवारा प्रस्तुत केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छत्रपती संभाजीनगर येथील प्रोफेसर डॉ. पंढरीनाथ रोकडे यांनी केले

याप्रसंगी भटिंडा पंजाब येथील सिंह ब्रार तसेच शिर्डी येथील उद्योजक श्री खंडेराव कडलक आणि अमरावतीचे उद्योजक राजाभाऊ उंबरकर संभाजीनगरचे सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव रामरुळे, जयराज कुटे डॉ रामदास सपकाळ इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी डॉक्टर धारूरकर यांनी लिहिलेल्या डॉक्टर हेडगेवार जीवन एवं कार्य या ग्रंथाचे डॉक्टर राकेश मिश्रा यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रीय पातळीवर विधायक कार्य करणाऱ्या कला साहित्य विज्ञान तंत्रज्ञान समाजसेवा इत्यादी क्षेत्रातील अखिल भारतीय पातळीवरील ३५ मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या समारंभात सर्वश्री क्रांती महाजन तसेच डॉक्टर राकेश मिश्रा आणि डॉ विल धारूरकर यांची समायोजित भाषणे झाली शेवटी सौ रेखाताई पिंपराळे यांनी सर्वांचे आभार मानले.































हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559